# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०५/२०२६ (रविवार )**

---

## पोलीस ठाणे भिवापूर येथे परवान्यापेक्षा जास्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द ४ गुन्हे नोंद
## १२ वाहनासह ९९ ब्रास रेती असा एकुण ३ कोटी ५२ लाख ९७ हजार रूपयांचा मुद्द्देमाल जप्त
## भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०५/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना अवैधरित्या रेती चोरी बाबतच्या मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुण अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या १२ वाहनांवर कारवाई करण्यात आली. १२ वाहनांसह ९९ ब्रास रेती असा मुद्द्देमाल जप्त करून एकुण ४ गुन्हे नोंद केले.

**दिनांक १७/०५/२०२६** रोजी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे पो.स्टे. भिवापूर हद्दीतून वाहनामध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांची मौजा जिचकार सभागृह च्या समोरील पोलीस स्टेशन टी — पाईट येथे भिवापूर पोलीसांनी नाकाबंदी करून पाहणी केली असता १) १२ चक्का टीप्पर क्रं एम.एच ४० सी.एस. ७३३९ वाहनामध्ये ९ ब्रास रेती २) १२ चक्का टिप्पर एम.एच.४० सी.डी. १९९१ मध्ये ८ ब्रास रेती, ३) १० चक्का टिप्पर क. एम.एचं. ४९ ए.टी. ४२९४ मध्ये ६ ब्रास रेती, ४) १२ चक्का टिप्पर क. एम. एच. ४० डि.सी. ८५५७ मध्ये ९ ब्रास रेती, ५) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.४० डि.सी ७८७९मध्ये ०९ ब्रास रेती ६) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.

४० डि.जी. ८६८७ मध्ये ०८ ब्रास रेती, ७) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच. ३३ टि ६९९९ मध्ये ८ ब्रास रेती, ८) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.४०डि.सी. ८६३७ मध्ये ०९ ब्रास रेती, ९) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच. ४० डि.सी. ७९७० मध्ये ०९ ब्रास रेती १०) १० चक्का टिप्पर क्रं एम.एच.४० सी. डि. ०९०१ मध्ये ०६ ब्रास रेती ११) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.४० सी. टि. ००७३ मध्ये ०९ ब्रास रेती आणि १२) १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.४० डि. सी. ८४३७ मध्ये ०९ ब्रास रेती अशा प्रकारे विनापरवाना क्षमतेपेक्षा जास्त रेती मिळून आल्याने सर्व रेती वाहन चालक/मालक यांच्यावर कारवाई करण्यात आली.

**नमुद वाहन क्रं १ चा आरोपी** गाडी मालक नामे प्रज्वल अंबोरे व गाडी चालक अक्षय वाणी, **वाहन क्रं २ चा** आरोपी गाडी मालक नामे राहूल बिरोने व गाडी चालक प्रमोद हटवार, **वाहन क्रं ३ चा** आरोपी गाडी मालक स्वप्निल गौतम व गाडी चालक छत्रपाल कुलस्ते, **वाहन क्रं ४ चा** आरोपी गाडी मालक आकाश गेडाम व गाडी चालक प्रमोद नान्हे, **वाहन क्रं ५ चा** आरोपी गाडी मालक कैफ शेख व गाडी चालक मंगेश भाजीपाले, **वाहन क्रं ६ चा** आरोपी गाडी मालक ललीत तिमांडे व गाडी चालक प्रद्युम्न ठाकरे, **वाहन क्रं ७ चा** आरोपी गाडी मालक/चालक शुभम पेटकर, **वाहन क्रं ८ चा** आरोपी गाडी मालक सुभाष देवाळकर व गाडी चालक श्रीराम गेडाम, **वाहन क्रं ९ चा** आरोपी गाडी मालक नंदू हटवार व गाडी चालक नंदू उरकुडे, **वाहन क्रं १० चा** आरोपी गाडी मालक लक्ष्मण कळंबे व गाडी चालक राकेश नेवारे, **वाहन क्रं ११ चा** आरोपी गाडी मालक हरिष नागपूरे व गाडी चालक महेश मेश्राम, **वाहन क्रं १२ चा** आरोपी गाडी मालक सुभाष देवाळकर व गाडी चालक आकाश रामटेके, **यांच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अधिनियम** सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम व सहकलम १५ पर्यावरण अधी सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, ६६(१), २०७ मोटार वाहन कायदया**न्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वर नमुद २३ आरोपींविरूध्द एकुण ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**सदर कारवाईत वर नमुद १२ वाहने आणि ९९ ब्रास रेती असा एकुण ३ कोटी ५२ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

# सांडपाण्याच्या पाईपलाईनमध्ये गुदमरून मरण पावलेल्या कामगारांच्या मृत्युस कारणीभूत कंत्राटदारावर गुन्हा नोंद.

पोलीस स्टेशन MIDC बोरी :— दि. १६/०५/२०२६ रोजी MIDC बोरी येथील **मौजा भारकस शिवार प्लॉट नं. के —३, ता. हिंगणा जि. नागपूर** च्या समोरील सांडपाण्याच्या पाईपलाईनच्या चेंबर मध्ये चोकअप असल्याने कंत्राटदार **गौरव पुरी वय ३२ वर्षे रा. मित्र विहार नगर, खरबी रोड, नागपूर** याने कोणत्याही सुरक्षा उपायांशिवाय त्याचे अधिनस्त काम करणारे सुपरवायजर प्रशांत मंजुळे आणि कामगार राहूल मडावी व सुरेश पाटेकर यांना बंद/चोक झालेल्या पाईपलाईनच्या चेंबरमध्ये सफाईसाठी उतरविले असता चेंबरमधील निर्माण झालेल्या विषारी वायूमुळे गुदमरूण प्रशांत मंजुळे आणि राहूल मडावी यांचा मृत्यु झाला तर सुरेश पाटेकर याची परस्थिती गंभीर आहे. नागपूर ग्रामीण दलातील पोलीस स्टेशन MIDC बोरी पोलीसांना घटनेची माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळावर पोहचले व चेंबर उघडून आत मध्ये गेलेल्या तिन्ही मजुरांना बाहेर काढले आणि प्रकृती गंभीर असलेला कामगार सुरेश पाटेकर याला तात्काळ उपचारकामी माया हॉस्पिटल बोरी येथे दाखल करण्यात आले असून त्याचे वर पुढील उपचार सुरू आहे. तसेच मयत झालेले प्रशांत मंजुळे आणि राहूल मडावी यांना एम्स् हॉस्पिटल येथे नेण्यात आले असून एम्स हॉस्पिटल येथे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकरणात जबाबदार व दोन मजुरांच्या मृत्युस कारणीभूत कंत्राटदार **नामे गौरव पुरी वय ३२ वर्षे रा. मित्र विहार नगर, खरबी रोड, नागपूर** याचे विरूध्द पोलीस ठाणे MIDC बोरी येथे कलम १०५ बीएनएस **सदोष मनुष्यवध** तसेच कलम ३,१४,१५,१६( हाताने मलमुत्र साफसफाई करण्याची नोकरी देणे व कोरडे शौचालय बांधकाम प्रतिबंध अधिनियम १९९३ ) अशा विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन MIDC बोरी पोलीस स्टेशन येथे सुरू आहे.

## पो.स्टे. कळमेश्वर येथील गोवंश कत्तलीच्या व MCOCA च्या गुन्ह्यातील फरार व पाहिजे असलेल्या आरोपीस स्था.गु.शा. ना.ग्रा. यांनी शोध घेवून घेतले ताब्यात

स्थानिक गुन्हे शाखा :— दि. १६/११/२०२५ रोजी पो.स्टे. कळमेश्वर हद्दीतील फेटरी येथे कत्तलीसाठी गोवंश जनावरे वाहून नेणाऱ्या ट्रक ला आग २ गोरे व २७ गाई अशा एकूण २९ गोवंश जनावरे मृत तसेच ८ गोवंश जनावरे जख्मी झालेल्या स्थितीत मिळून आले होते. गोवंश जनावरे वाहून नेणारे आरोपी ट्रक ला आग लागल्याचे पाहून घटनास्थळावरून पसार झाले होते. सदर प्रकरणात गुन्ह्यातील आरोपीतांविरूध्द कलम ३२५(ग), ६१(२) भारतीय न्याय संहिता सहकलम ११(१)(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रति. अधि. सहकलम ५(१)(अ),९ महा. पशु संरक्षण अधि. सहकलम ३(१) सार्व.संपत्तीस हानी प्रति. अधि. सहकलम ८(ब) राष्ट्रीय महा. अधि. सहकलम ७ फौजदारी सुधारणा कायदा सहकलम १३७/१७७ मो.वा.का. सहकलम ३(१)(२),३(२),३(४) महा. संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी नामे **सचिन सुरेश वंजारी वय ३० वर्षे रा. लाखणी जि. भंडारा** हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. मा. पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा श्री. हर्ष पोद्दार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सदर आरोपीचा शोध घेण्याचे निर्देश दिले असता पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने, स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक किशोर शेरकी व त्यांचे पथकाने सदर आरोपीचा कशोशिने शोध घेवून त्यास दि. १६/०५/२०२६ रोजी ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीस पो.स्टे. कळमेश्वर च्या ताब्यात देण्यात आले.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १५/०५/२०२६ व दि. १६/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन बुटिबोरी :– **पो.स्टे. बुटिबोरी** अंतर्गत बुटिबोरी पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना १) आरोपी नामे **अफताब अकबर अंसारी वय १९ वर्ष राहणार नईम मोहल्ला दालटंडगंज पोस्टे दालटंडगंज जिल्हा पलामु राज्य झांरखंड ह.मु. गोसीया मस्जीद जवळ नवीन वस्ती बुटीबोरी ता.जि.नागपुर** हा मौजा बुटीबोरी पुण्यनगरी प्रेसचे रोड लगत एका आडजात झाडा खाली सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच २) आरोपी नामे **प्रल्हाद खुशाल सांडीलकर वय ३३ वर्ष रा. निखाडे ले आउट शिरूळ रिधोरा सातगाव तुषार इंगोले यांचे घरी किरायाने ता.हिंगणा जि. नागपुर** हा मौजा सातगाव परिसरातील एच.डी.एफ.सी बॅक चे समोरील खुल्या मोकळया जागेतील सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. वरील दोन्ही आरोपीतांकडून पंचासमक्ष अर्धवट जळालेल्या गांजाने भरलेली काळपट रंगाचे चिलम ज्यामध्ये मळकट लाल, पिवळे रंगाचे कापडाचा लहान तुकडे व माचीस असे साहित्य जप्त करून त्यांचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

पोलीस स्टेशन देवलापार :– **पो.स्टे. देवलापार** अंतर्गत देवलापार पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना १) आरोपी नामे विनोद धुपलाल भलावी वय ३१ वर्ष रा. सितापार गोंडी ता. रामटेक व २) आरोपी नामे सचिन रामसिंग विश्वकर्मा वय २५ वर्षरा. धोंडीवाडा ता. बरघाट जिल्हा – सिवनी मध्य प्रदेश यांची मौजा वडम्बा गावातून बाहेर जाणाऱ्या रोड च्या बाजूला सार्वजनिक ठिकाणी पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून प्रत्येकी दोन गर्द पावडर पिण्याची पन्नी, दोन गर्द पावडर पिण्याची पुंगळी, चार बिडी असे साहित्य मिळून आल्याने सदर आरोपीतांकडून नमूद साहित्य जप्त करून त्यांचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी. एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

## जुगार खेळणाऱ्या आरोपींवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई
## (१३ आरोपीतांविरूध्द एकूण ०९ गुन्हे नोंद व ९६६९/– रू. चा माल जप्त)

पोलीस स्टेशन मौदा :– दिनांक १६/०५/२०२६ रोजी पो.स्टे. मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ५२ ताशपत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा तारसा जॉईट** येथे वेगवेगळ्या दोन ठिकाणी पंचासमक्ष धाड

टाकली असता आरोपी नामे **१) प्रविण सुदाम हटवार वय ३६ वर्ष रा. तारसा जॉइंट ता. मौदा, २) इंद्रजित तुळशिराम ब्राम्हणकर वय ४० वर्ष रा. नरसाळा, ३) संजय बापूराव बावणे वय ४५ वर्ष रा.तारसा जॉइंट ता. मौदा आणि ४) शिवशंकर माणीकराव नागतोडे वय ४१ वर्ष रा. भोवरी ता. कामठी जि. नागपूर** हे पैशाचा डाव लावून ५२ **ताशपत्त्यांचा जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून तसेच डावावरून नगदि ७२०/— रू. आणि ५२ ताशपत्त्याच्या २ किट जप्त** करण्यात आले असून आरोपींविरूध्द पो.स्टे. मौदा येथे **कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.**

**पोलीस स्टेशन वडोदा :—** दिनांक १६/०५/२०२६ रोजी पो.स्टे. वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा कुही फाटा** येथे वेगवेगळ्या दोन ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **१)** गणेश बळीराम चंद्रवंशीवय २०वर्षे रा.चिखली कलमना जि. नागपुर **२)** भैया गुलाब ढोके वय. ६० वर्षे रा. वडोदा ता. कामठी हे ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, नगदि ४७१९/— रू. आणि बॉलपेन किं. १० रू. असा एकूण ४७२९/— रू. चा माल जप्त करण्यात आला** असून आरोपींविरूध्द पो.स्टे. वडोदा येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.**

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक १६/०५/२०२६ रोजी पो.स्टे. पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ५२ ताशपत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा बाबूळवाडा शिवार** येथे पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **१) राहूल मधूकर वाघाडे वय ३१ वर्ष रा. बाबूळवाडा ता. पारशिवनी जि. नागपूर २) विष्णू दशरथ राउत वय ५३ वर्ष रा. आमगाव ता. पारशिवनी जि. नागपूर ३) फरार आरोपी नामे विनोद अजाबराव झूरे रा. बाबूळवाडा** हे पैशाचा डाव लावून ५२ **ताशपत्त्यांचा जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून तसेच डावावरून नगदि ७७०/— रू. आणि ५२ ताशपत्ते जप्त** करण्यात आले असून

आरोपींविरूध्द पो.स्टे. पारशिवनी येथे **कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १६/०५/२०२६ रोजी पो.स्टे. काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा तार बाजार** येथे पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **राजेश छोटेलाल बेहनिया रा. कारला, काटोल जि. नागपुर** हा ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आला. **आरोपीच्या ताब्यातून सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, निळ्या शाईचा बॉल पेन आणि नगदि ९५०/— रू. असा माल जप्त करण्यात आला** असून आरोपीविरूध्द पो.स्टे. काटोल येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक १६/०५/२०२६ रोजी पो.स्टे. बोरी पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर १) **मौजा बोरखेडी फाटक येथील सव्हीस रोड लगत एका टिनाचे बंद पानठेल्याचे मागे** या ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **अभिजीत भिमराव शेन्डे वय २० वर्ष राहणार वार्ड क्र. ०१ मुपो भिसी तालुका चिमुर जिल्हा चंद्रपुर ह.मु. काळे यांचे घरी किरायाने गोदावरी नगर बुटीबोरी** तसेच **२)** शिव अन्नपुर्णा मंदीर च्या मागे बाजार चौक बुटीबोरी येथे दोन वेगवेगळी धाड टाकली असता आरोपी नामे **रविंद्र गुलाब चिकराम, वय ५५ वर्षे, राह. वार्ड नं. ४ बुटीबोरी ता.जि. नागपूर आणि प्रवीण वासुदेव पाटील, वय ५९ वर्ष, राह. वार्ड नं. ५३, लायब्ररी जवळ लश्करी बाग, नागपूर ह. मु. एसीसी चौक, श्री. खंते याचे घरी किरायाने टाकळघाट** हे ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, नगदि १५८०/— रू. आणि बॉलपेन किं. २० रू. असा एकूण १६००/— रू. चा माल जप्त करण्यात आला** असून आरोपींविरूध्द पो.स्टे. बोरी येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये ३ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद

दिनांक १६/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण **१०,२३,६००/—** रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण **२७** गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे दारूचे सेवन करून धामधूम करणारा आरोपी नामे कार्तीक रमेश खंडाते वय २६ रा. कपिलेश्वर रोड केळवद याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे अवैध हातभट्टीची मोहफुलांची दारू काढून जवळ बाळगून विक्री करणाऱ्या एकूण ११ महिला आरोपींविरूध्द प्रत्येकी १ गुन्हा असे एकूण **११ गुन्हे नोंद व एकूण ९,७४,८०० रू.** मुद्देमाल जप्त, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे दारूचे सेवन करून धामधूम करणारा आरोपी नामे रितेश शंकरराव मारबते वय ४४ वर्ष रा. वार्ड क्र ०२ सावनेर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे अवैध हातभट्टीची मोहफुलांची दारू काढून जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी प्रकाश बाळकृष्णा शेन्द्रे वय ३५ वर्ष रा.टेकाडी ता.सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बुटीबोरी** येथे देशी दारू जवळ बाळगूण विक्री करणारे आरोपी क्र. १) सुनील स्टॅन्डी पॉल वय ४० वर्षे रा. वार्ड क्र. १, बोरखेडी रेल्वे ता. जि. नागपुर व २)अंबीर सुधाकर काकडे वय ३० वर्ष रा ढवळपेठ त जि नागपुर यांचे वर प्रत्येकी १ तसेच दारूचा अवैध गुत्ता चालविणारे आरोपी नामे ३) १. जयंत पुंजारामजी ठाकरे, वय ४२ वर्ष, रा. झिल्पा, ता. काटोल, ह.मू. रूईखैरी, ता.जि. नागपूर

२. इल्लीयाज उर्फ ईल्लू शफी शेख,रा. बूटीबोरी, ता. जि. नागपूर यांचे वर १ असे एकूण ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे उमेश बशीर पात्रे, वय ३२ वर्ष, रा. सत्रापुर कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे रवि हरीचंद्र गायकवाड वय.५० वर्ष याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारे आरोपी आरोपी नामे १) सुनिल बुधाजी

मांढरे वय ३८ वर्शे रा. डोगरमौदा ता. कुही व २) महिला आरोपी रा. डोगरमौदा यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे अवैध हातभट्टीची मोहफुलांची दारू काढून जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे रमेश ईटनकर वय३३ वर्श रा.राजाजी वार्ड रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** दारूचे सेवन करून धामधूम करणारा आरोपी नामे विकास वसंतराव सयाम वय ३५ वर्ष रा खुर्सापार याचे विरूध्द १ गुन्हा तसेच देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे विनोद लक्ष्मण काचेवार वय ४१ वर्ष रा खापरीबारोकर याचे विरूध्द १ गुन्हा असे एकूण २ गुन्हे, **पोलीस स्टेशन काटोल येथे** दारूचे सेवन करून धामधूम करणारे आरोपी नामे गजानन लक्ष्मण वाघमारे वय ५१ वर्ष रा. येरला धोटे ता. काटोल व २) प्रविण अशोक बोरडे वय ३८ वर्ष रा. सिंगारखेडा यांचे विरूध्द प्रत्येकी १ गुन्हा तसेच देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे संदीप शामराव निकोसे रा घरतवाडा काटोल जि नागपुर याचे विरूध्द १ गुन्हा असे एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले.

**(नमुद कारवाईत एकुण १) १३३० लिटर मोहाफुल गावठी दारू २) ११८८० मिली देशी दारू असा एकुण १,३८,३८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आला तसेच नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.)**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने